# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–३०/०६/२०१६.

**१) केबल वायर ची चोरी:–**

दिनांक १५/६/२०१६ ते दिनांक २९/६/२०१६ चे ०९.००वा. दरम्यान फिर्यादी चंद्रशेखर वकील वानखेडे वय ४६ वर्ष, रा. नेहरूवार्ड खापा/तुमसर यांनी आपल्या शेतात पाणी देण्याकरीता सबमर्सिबल पंपाला केबल वायर ३०० फुट कि.५,५००/–रू चा लावला होता. तो केबल वायर कोणीतरी अनोळखी चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेला. असे फिर्यादिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा गि–हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) ट्रकची चोरी :–**

दिनांक २८/०६/२०१६ चे १९.०० वा. ते दिनांक २९/६/२०१६ चे १०.३० वा.दरम्यान फिर्यादी बंडु शामरावजी सतीबावणे वय ३८ वर्ष रा. वार्ड नं. ०२ लाखोरी रोड लाखनी यांचा ट्रक क्र. सीजी ०४ जेए ७६६६ कथ्था रंगाचा, १० चक्का असलेला कि.४,००,००० /–रूपयाचा हा ताज गॅरेज समोर एनएच ६ सर्विस रोडवर दुरूस्ती करीता ठेवला असतांना कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेला. फिर्यादी चे तोंडी रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) फोटोग्रफरचे दुकानातील कॅमे–याची चोरी. :–**

दिनांक २८/०६/२०१६ चे १३.३० ते १५.३० वा.दरम्यान फिर्यादी प्रमोद हिवराज भोवटे वय २८ वर्ष रा. भागडी हा त्याचे भागडी येथील फोटोग्रफीचे दुकानात विद्युत नाही, व विद्युत पुरवठा खंडीत झाला असल्याने दुकानाच्या गल्लीत खाजगी कामाने गेला तेव्हा दुकानात कोणीही नसल्याची संधी साधुन कोणीतरी अनोळखी चोराने दुकानात प्रवेश करून दुकानात ठेवलेला १ निकॉन कंपनीचा कॅमेरा कि.२५,०००/–रू व १ सोनी कंपनीचा कॅमेरा कि.१०,०००/–रू असा एकुण ३५,०००/–रू चा माल चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनी कुंभरे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–**

दिनांक २९/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे.जवाहरनगर,कारधा,वरठी, तुमसर, लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७१ लिटर हातभट्टी दारू कि. ५,४२०/–रू. व ०४ लिटर ५०० मि.ली. देशी दारू कि. १,२५०/–रू. तसेच जुगारातुन कि. ४१०/–रू. असा एकुण कि. ७,०८०/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.